बी.एस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रमास मान्यता देण्याबाबत. .

सरस्वती बहुउद्देशिय शिक्षणं संस्था, साहिल लॉन्स जवळ, बडनेरा रोड, अमरावती संचलितं सरस्वती इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग सायन्सेस ॲन्ड रिसर्च, मु.पो.मासोद, ता.व जि.अमरावती.

## महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: एनयुआर-२०२०/प्र.क्र.५३/२०/शिक्षण-१
९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक: ०५ मार्च, २०२१.

वाचा :
१) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.मआविवि/पीबी/युजी/१६४७/२०१९, दि. २३.१२.२०१९.
२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्र.एनयुआर-२०१७/प्र.क्र.२१२/१७/शिक्षण-१, दि. २८ फेब्रुवारी, २०१८.
३) संचालक, वैद्यकीय शिक्षण यांचे पत्र क्र.एनयुआर/नवीन महाविद्यालय, अमरावती/बी.एस्सी(न.)४०/सरस्वती इन्स्टिट्युट ऑफ नर्सिंग/६३१६/ खाजगी/ई/२०२०, दि.२२.१०.२०२०.

प्रस्तावना:

सरस्वती बहुउदेशिय शिक्षण संस्था, साहिल लॉन्स जवळ, बडनेरा रोड, अमरावती संचलित सरस्वती इन्स्टिट्युट ऑफ नर्सिंग सायन्सेस ॲन्ड रिसर्च, मु.पो.मासोद, ता.व जि.अमरावती या महाविद्यालयाचा बी.एस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.(१) येथील पत्रान्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून शासनास प्राप्त झाला होता. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी सदर प्रस्तावाची शिफारस केली होती. संदर्भ क्र.(२) येथील शासन निर्णयातील तरतूदीनुसार, सदर संस्थेची संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेमार्फत सक्षमता तपासणी करण्यात आली. संचालक, वैद्यकीय शिक्षण यांनी सक्षमता तपासणीचा अहवाल संदर्भ क्र.(३) येथील पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सक्षमता तपासणी समितीने उक्त संस्था बी.एस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्यास सक्षम असल्याची शिफारस केली आहे. संचालक, वैद्यकीय शिक्षण यांचेकडून प्राप्त सदर शिफारस विचारात घेऊन, उक्त संस्थेस शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी ४० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह बी.एस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी संदर्भ क्र. (३) अन्वये सक्षमता तपासणी समितीच्या अहवालाच्या आधारावर केलेली शिफारस विचारात घेऊन, सरस्वती बहुउद्देशिय शिक्षण संस्था, साहिल लॉन्स जवळ, बडनेरा रोड, अमरावती संचलित सरस्वती इन्स्टिट्युट ऑफ नर्सिंग

सायन्सेस ॲन्ड रिसर्च, मु.पो.मासोद, ता.व जि.अमरावती या महाविद्यालयास सन २०२०-२१ साठी ४० (चाळीस) विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह बी.एस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरू करण्यास पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून याद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती :

१) सदर अभ्यासक्रमाचे प्रवेशाकरिता राज्य शासन/ केंद्रशासन/ मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कार्यपद्धती अवलंबण्यात यावी.

२) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व राज्य शासन यांनी बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

३) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी घातलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

४) महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिट्युशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट क्र.VI १९८८) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

५) शासकीय नियम / अधिनियमाच्या आधारे तसेच मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपद्धती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

६) संस्था, त्यांच्या महाविद्यालयात शासकीय वैद्यकीय/दंत/ परिचर्या महाविद्यालयातील शिक्षकांना ते नियतवयोमानुसार सेवानिवृत्त अथवा स्वेच्छा सेवानिवृत्त असल्याखेरीज कोणत्याही परिस्थितीत नोकरीत ठेवणार नाही.

७) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या प्रमाणकांची योग्यरित्या पूर्तता करून संस्थेने प्रथम तुकडी बाहेर पडेपर्यंत दरवर्षी शासनाची मान्यता मिळविणे आवश्यक आहे.

८) संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरूपाच्या खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही.

९) सदर मान्यता संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या तपासणी अहवालाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१०) संस्थेने बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालयास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची संलग्नता मिळाल्यानंतरच विद्यार्थी प्रवेशित करावेत.

११) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करु नयेत.

१२) संस्थेला गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची निश्चिती शुल्क नियामक प्राधिकरणाकडून करुन घेणे बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ च्या कलम ६४ नुसार शासनास प्रदत्त अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ. श्री.पु. कोतवाल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (वै.शि.), यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (वै.शि.) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. सचिव, भारतीय परिचर्या परिषद, कोटला रोड, नवी दिल्ली-११० ००२.
७. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
८. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
९. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ व ९ वा मजला, न्यु एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के. नायक मार्ग, फोर्ट-४००००१.
१०. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, शासकीय तंत्रज्ञान इमारत, ३०५, ३ रा मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.
११. प्रबंधक, महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई.
१२. अध्यक्ष/सचिव, सरस्वती बहुउद्देशिय शिक्षण संस्था, साहिल लॉन्स जवळ, बडनेरा रोड, अमरावती-४४४७०१.
१३. अवर सचिव, शिक्षण-२, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. निवडनस्ती (शिक्षण-१).